# घटक ३
## जॉन बोर्डल रॉल्स

**३.० उद्दिष्टे**
**३.१ प्रास्ताविक**
**३.२ विषय विवेचन**
**३.२.१ जीवन परिचय**
**३.२.२ न्यायविषयक संकल्पना**
**३.२.३ स्वातंत्र्य विषयक विचार**
**३.२.४ समतेविषयक विचार**
**३.२.५ सुव्यवस्थित समाजरचनेची संकल्पना**
**३.२.६ नागरी आज्ञाभंगाची कल्पना**
**३.३ सारांश**
**३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**
**३.५ सरावासाठी स्वाध्याय**
**३.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

**३.० उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टी समजून येतील.

१. जॉन रॉल्स यांचे न्यायविषयक विचार समजून येईल.

२. जॉन रॉल्स स्वतंत्र विषयक विचारांमध्ये कोणती व्यक्ती स्वतंत्र आहे, कोणत्या बंधनापासून स्वतंत्र आहे आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या कक्ष कोणत्या आहेत हे समजून घेता येईल.

३. जॉन रॉल्स यांच्या समता विषयक विचारांमध्ये राज्यव्यवस्थेने कोणत्या प्रकारची भूमिका साकारावी हे अभ्यासता येईल.

४. जॉन रॉल्सयांची सुव्यवस्थेत समाज रचनेची संकल्पना समजून घेता येईल.

५. कायद्याच्या माध्यमातून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी नागरी नागरी आज्ञाभंगाचा वापर करता येतो हे जॉन रॉल्स यांच्या विचारातून समजून घेता येईल

**३.१ प्रास्ताविक** :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस दोन राजकीय विचारधारा प्रस्थापित झाले होते. त्यामध्ये एक म्हणजे लोकशाही-उदारमतवादी विचारप्रणाली आणि दुसरी म्हणजे मार्क्सवादी-साम्यवादी विचारप्रणाली होय. उदारमतवादी विचारप्रणालीमध्ये स्वातंत्र्य या मूल्याला प्राधान्य दिले जाते तर साम्यवादी विचारप्रणालीत समता या मूल्याला प्राधान्य दिले जाते. परंतु विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात दोन महायुद्धे झाली. त्यातून फॅसिझम आणि नाझीझम सारखे विचारप्रणाली निर्माण झाले. अर्थात ते अल्पकालीन ठरले. त्यातच साम्राज्यवादी पारतंत्र्यातून मुक्त होऊन आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले. १९१९ साली रशियात तर १९४८ साली चीनमध्ये साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारित क्रांत्या झाल्या, या सर्व अस्थिरतेच्या काळामध्ये लोकशाही उदारमतवादी विचारांची नव्याने मांडणी करण्याची गरज भासू लागली व ती जॉन बोर्डल रॉल्स या नव-उदारमतवादी तत्त्ववेत्याने विचाराची मांडणी केली. विसावे शतक राजकीय विचारांच्या दृष्टीने अत्यंत क्रांतिकारी शतक मानले जाते. या शतकात जगाची विभागणी उदारमतवादी लोकशाही विचारप्रणाली आणि साम्यवादी विचारप्रणालीत झाली. या विचारधारांच्या संघर्षातून दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शीतयुद्धाची सुरुवात झाली. शीतयुद्धामुळे जगाची विभागणी दोन गटांत झाली. या परस्परविरोधी संघर्षात समता आणि स्वातंत्र्य मूल्यांची नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता वाटत होती तेव्हा ती गरज जॉन रॉल्सने मांडलेल्या नवउदारमतवादी तत्त्वज्ञानाने पूर्ण केली. रॉल्सने स्वातंत्र्य आणि समता मूल्यांत समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करून लोकशाही उदारमतवादी तत्त्वज्ञानाची नव्याने मांडणी केली.

**३.२ विषय विवेचन**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील एक अत्यंत महत्त्वाचा तत्त्वज्ञ म्हणून जॉन बोर्डल रॉल्स हे नाव पुढे येते. कारण त्याने न्यायसिद्धान्ताची नव्याने मांडणी केली. त्याने मांडलेल्या सिद्धान्ताचा प्रभाव प्रत्यक्षात वेगवेगळ्या देशांतील राजकीय धोरणांवर पडलेला आपणास दिसून येतो. त्याने प्रथम १९७१ साली 'न्यायाचा सिद्धान्त' हा ग्रंथ लिहिला.या न्यायसिद्धान्ताने अनेक नवे प्रश्न निर्माण केले. त्याने उपयुक्ततावाद्यांच्या न्यायकल्पनेस आव्हान दिले आणि सामाजिक कराराच्या कल्पनेचे पुनरुज्जीवन केले. रॉल्सच्या विचारावर मोठेच विचारमंथन झाले आणि त्यानंतर त्याने १९९३ साली राजकीय उदारमतवाद हा ग्रंथ लिहून आपल्या काही भूमिका स्पष्ट केल्या. ‘न्याय म्हणजे रास्तपणा’ हा सिद्धान्त त्याने एक राजकीय संकल्पना म्हणून मांडला. न्याय म्हणजे रास्तपणा हा राजकीय उदारमतवादी विचार मांडत असताना त्याचे उपयोजन खुल्या समाजात जेथे वेगवेगळ्या संस्था व विचार कार्यरत आहेत तेथे कशा प्रकारे करावे याचे विवेचन रॉल्सने केले. या घटकाचा अभ्यास

केल्यानंतर जॉन रॉल्स यांचे न्यायविषयक विचार, स्वतंत्र विषयक विचारांमध्ये तीन पैलूंच्या माध्यमातून कोणती व्यक्ती स्वतंत्र आहे कोणत्या बंधनापासून स्वतंत्र आहे आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या कक्ष कोणत्या आहेत,समता विषयक विचारांमध्ये राज्यव्यवस्थेने कोणत्या प्रकारची भूमिका साकारावी लागते. सुव्यवस्थेत समाज रचना कोणती आहे, कायद्याच्या माध्यमातून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी नागरी आज्ञाभंगाच्या तत्त्वाचा वापर करणे हा नागरिकांचा हक्क आहे. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थित नागरी आज्ञाभंगाचा वापर करता येतो हे जॉन रॉल्स यांच्या विचारातून समजून घेता येईल. तसेच त्याने याची सुरुवात 'Distributive Justice' या आपल्या निबंधात केली होती. राजकीय उदारमतवादाच्या संदर्भात वेगवेगळ्या रचना व आकार धारण करणाऱ्या राजकीय व्यवस्था आपणास न्यायाच्या सिद्धान्तावर कशा उभा करता येतील व या बहुविध राजकीय संकल्पना व विचार यांतून एक प्रकारची सहमती कशी निर्माण करता येईल हे प्रस्तुत घटक चे अवलोकन केल्यास समजून घेता येईल.

### ३.२.१ जीवन परिचय

जॉन बोर्डल रॉल्स (John Bordley Rawls) (इ.स. १९२१ ते २००३) जॉन रॉल्स बाल्टीमोर, मेरीलँड येथे २१ फेब्रुवारी १९२१ रोजी जन्मला. १९३९ मध्ये तो शिक्षणासाठी प्रिन्स्टन विद्यापीठात दाखल झाला व तेथून त्याने १९४३ साली बी. ए. ची पदवी संपादन करून लष्करात भरती झाला. लष्करात काम करत असताना त्याने न्यू गिनी, फिलिपिन्स, जपान या देशांना भेटी दिल्या. तो हिरोशिमावरील अणुहल्ल्याचा साक्षी होता. लष्करात बढती मिळत असतानाही रॉल्स लष्कराची नोकरी सोडून पुन्हा प्रिन्स्टन विद्यापीठात पीएच. डी पदवी मिळवण्यासाठी दाखल झाला आणि १९५० साली त्याने नीति-तत्त्वज्ञान (Moral Philosophy) ह्या विषयात पीएच. डी. पदवी संपादन केली. १९५२ मध्ये तो फुलब्राईट शिष्यवृत्ती (Fulbright Scholarship) मिळवून ऑक्सफर्ड येथे रवाना झाला. तेथे तो प्रख्यात राजकीय तत्त्वज्ञ व उदारमतवादी विचारवंत इसाया बर्लिन (Isaiah Berlin) याच्या संपर्कात आला व त्याच्या तत्त्वज्ञानाने तो प्रभावीत झाला. कॉर्नेल विद्यापीठात तो प्रथम साहाय्यक प्राध्यापक म्हणून व १९६२ पासून तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून काम करू लागला. त्याच कालावधीत १९६० च्या दशकात त्याची महत्त्वाची यशाची पायरी म्हणजे त्याला Massachusetts Institute of Technology ह्या जगविख्यात संस्थेत बोलावले गेले. परंतु तेथून दोनच वर्षात तो हॉर्वर्ड विद्यापीठात दाखल झाला व पुढील सुमारे चाळीस वर्षे तो तेथे राहिला.

**ग्रंथसंपदा :**

उदारमतवादी राजकीय विचारवंत व त्या तत्त्वज्ञानाला त्याने दिलेल्या योगदानाबद्दल प्रसिद्ध आहे. त्याने लिहिलेल्या खालील पुस्तकांना जगभरातून मान्यता मिळाली.

१) The Two Principles of Justice

२) A Theory of Justice

३) Political Liberalism and Justice as Fairness

४) Political Liberalism

५) The Laws of Peoples

जॉन रॉल्सने 'The Two Principles of Justice' या पुस्तकात स्वातंत्र्याचे तत्त्व आणि बहुविधतेचे तत्त्व विस्ताराने मांडले आहे. या त्याच्या तत्त्वज्ञानाबाबत दोनही बाजूनी मते नोंदवली गेली. काही विचारवंतांच्या मते, रॉल्सने उदारमतवादी विचारात मोलाची व कायमस्वरूपी भर घातली. जॉन रॉल्सच्या पुस्तकामुळे राजकीय तत्त्वज्ञानातील उदारमतवादी विचाराचे शैक्षणिक विश्वात पुनरुज्जीवन झाले. रॉल्सचे A Theory of Justice हे एक अत्यंत महत्त्वाचे पुस्तक आहे. ह्या पुस्तकात रॉल्सने आपल्या वैचारिक प्रयोगशीलतेतून 'मूलभूत स्थिती' ही संकल्पना मांडली आहे. त्या आधारे त्याने समाजातील लोकांपुढे न्यायाची दोन तत्त्वे सर्वसाधारणतः मांडली आहेत. ती तत्त्वे अज्ञानाच्या पडद्या आडून (Veil of ignorance) मांडतात अशी रॉल्सची भूमिका आहे. ही रॉल्सची आणखी एक संज्ञा आहे. रॉल्सची 'मूलभूत स्थिती' (Original position) ही संकल्पना त्याने थॉमस हॉब्ज, जॉन लॉक आणि रुसो यांच्या सामाजिक कराराच्या कल्पनेतून विकसित केली आहे. रॉल्स म्हणतो, समाजातील विविध लोकांचे प्रतिनिधित्व करणारे धुरीण हे समाजाच्या मूळ ढाच्याचे प्रशासनासाठी 'न्यायाची स्पष्टता' (Justice as fairness) हे मूलभूत तत्त्व म्हणून अवलंबतील. या तत्त्वात स्वातंत्र्याचे तत्त्व (Liberty principle) आणि बहुविधतेचे तत्त्व (Difference principle) यांचा अंतर्भाव असेल. समाजाच्या मूलभूत स्थितीवर या तत्त्वांचे काय परिणाम होतात हे तपासण्यासाठी रॉल्स विशिष्ट परस्थितीच्या संदर्भात विचारपूर्वक समतोल साधणाऱ्या प्रक्रियेचाही आधार घेतात. या सर्व संज्ञा आणि संकल्पनांचा आशय त्याच्या न्यायाच्या तत्त्वज्ञानामध्ये स्पष्ट केलेला आहे. सामाजिक करार सिद्धान्तांमधून हॉब्ज, जॉन लॉक आणि रूसो यांनी मांडलेल्या संकल्पना जॉन बोर्डल रॉल्स यांनी विकसित केल्या आहेत. जॉन बोर्डल रॉल्स यांनी न्याय विषयक तत्त्वज्ञान आणि त्यावर आधारित न्याय समाजाची उभारणी करताना सर्वांना समान मूलभूत स्वातंत्र्य दिले पाहिजे ही भूमिका मांडून समता आणि स्वातंत्र्य तत्त्वांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला.

### ३.२.२ न्यायविषयक संकल्पना

न्याय ही राज्यशास्त्रात ऐतिहासिक काळापासून अभ्यासली जाणारी संकल्पना आहे. प्राचीन काळात ही संकल्पना आध्यात्मिक किंवा मानसिक-धार्मिक संदर्भात विचारात घेतली गेली.

त्या काळातील समाजव्यवस्था व त्यातील प्रश्न हे वेगळया प्रकारचे होते. प्लेटोच्या काळापासून राज्यशास्त्रात न्याय संकल्पनेबद्दल विविध सिद्धान्त आणि विचार मांडलेले आहेत. ॲरिस्टॉटल, जॉन लॉक, रूसो, कांट, हेगेल इत्यादी विचारवंतांनी न्यायविषयक विचार मांडलेले आहेत. भारतीय तत्त्वज्ञानातदेखील न्याय संकल्पनेचा सविस्तर चर्चा केलेला दिसतो. मात्र, प्राचीन काळी या संकल्पनेचा विचार आध्यात्मिक, धार्मिक आणि मानसिक आधारावर केला गेला. जॉन बोर्डल रॉल्सच्या विचारातील मध्यवर्ती संकल्पना म्हणजे 'न्यायविषयक विचार' मानले जातात. न्यायविषयक संकल्पनेच्या आधारावर तो न्यायाधिष्ठित समाजरचनेची उभारणी करण्याचा प्रयत्न करतो. समाजात अस्तित्वात असलेल्या विषमतेमुळे सेवा सुविधाचे वाटप विषम पद्धतीने होत असते. रॉल्स वितरणात्मक न्याय सिद्धान्ताच्या आधारे भांडवलशाही आणि समाजवादी या दोन्ही व्यवस्थात सेवासुविधांचे वाटप न्याय पद्धतीने करता येईल या पद्धतीने विचारांची मांडणी करतो. न्याय या संकल्पनेचा वापर व्यक्ती आणि त्यांच्या परस्परातील संबंधाबाबत वापरली जात असली तरी तिला सामाजिक संदर्भदेखील आहे. व्यक्ती व्यक्तीतील संबंधातून विविध संस्था आणि समाजाची उभारणी होत असते. विसाव्या शतकात निर्माण झालेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यास पारंपरिक न्याय संकल्पना अपुरी होती. भांडवलशाही व्यवस्थेच्या प्रभावामुळे या शतकात उदारमतवादी लोकशाही ही आदर्श आणि सर्वोत्कृष्ट आहे आणि त्या व्यवस्थेत सर्व प्रश्नांचे निराकरण होईल व सर्वांना न्याय मिळेल असा विचार मांडला जात होता. मात्र, जॉन बोर्डल रॉल्सच्या मते, उदारमतवादी विचार आणि सिद्धान्त समाजातील सर्वांना न्याय मिळवून देण्यास अपुरे आहेत. समाजातील सर्व व्यक्तींच्या स्वातंत्र्य संरक्षणासाठी सद्यःकालीन उदारमतवादी विचार आदर्श नाहीत. कारण त्यात अल्पसंख्याकांचा विचार केला गेला नाही. लोकशाही उदारमतवादात बहुसंख्याकांचे हित लक्षात घेऊन कायदे तयार केले जातात आणि राज्यकारभार केला जातो. त्यामुळे अल्पसंख्याकांवर कायमस्वरूपी अन्याय होतो. अल्पसंख्याकांवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी रॉल्सने न्यायाचे तत्त्वज्ञान मांडलेले आहेत.

### जॉन रॉल्सचा न्याय सिद्धान्त विचार

जॉन रॉल्स यांनी सर्वप्रथम न्याय कल्पना उदारमतवादी विचाराच्या माध्यमातून १९५८ मध्ये 'Justice as Fairness' निबंधाद्वारे सर्वप्रथम सामाजिक सद्‌गुणाच्या दृष्टीने न्याय संकल्पनेचे विवेचन केले. या निबंधाला मिळालेल्या प्रतिसादातून आपल्या न्यायविषयक संकल्पनेचा विस्तार करण्यासाठी 'A Theory of Justices' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. सामाजिक न्याय संकल्पनेस मध्यवर्ती मानून हा ग्रंथ लिहिलेला आहे. रॉल्सच्या न्यायविषयक सिद्धान्ताला तत्कालीन सामाजिक आणि राजकीय घटनांचा संदर्भ आहे. व्हिएटनाम युद्ध आणि अमेरिकतील कृष्णवर्णीयांच्या नागरी हक्क

चळवळीतून उपस्थित प्रश्न आणि सामाजिक न्यायाच्या निकडीच्या गरजांचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यांची न्याय कल्पना उदारमतवादी अर्थशास्त्राशी संबंधित असून त्या व्यवस्थेस अभिप्रेत मानवी स्वभाव व व्यवहार गृहीत धरतो. समाज हा व्यक्ती आणि संस्थांच्या सहकार्यातून तयार होत असल्यामुळे न्यायाचा संबंध सामाजिक व्यवहाराशी येत असतो. व्यक्ती आणि त्यांच्या कृती संदर्भात वापरली जात असली तरी व्यक्तीच्या स्वार्थी हितसंबंधामुळे परस्परसंबंधात आणि ते ज्या संस्थेत कार्यरत आहेत. तेथे संघर्ष निर्माण होतात आणि त्या संघर्षातून काही व्यक्तींवर अन्याय होत असतो. म्हणून रॉल्सने न्याय तत्त्वांच्या आधारे आदर्श समाजरचनेची मांडणी करतो. त्या समाजरचनेत व्यक्ती आणि संस्था आपापल्या जबाबदारी आणि कर्तव्यानुसार व्यवहार करतील त्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही.

जॉन बोर्डल रॉल्स  हे हॉब्ज, लॉक, रूसोप्रमाणे करारवादी विचारवंत आहेत. त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान अमूर्त स्वरूपाचे असून न्यायाधिष्ठित समाजरचना निर्माण करण्यासाठी तो काही गृहीतके गृहीत धरतो. समाजाची मूळ स्थिती (Original Position) हे प्रथम गृहीतक मांडतो. मूळ स्थितीत मानव विवेकशील मार्गाने चालतो. चांगल्या-वाईटाची त्याला जाण असते. स्वहितासाठी कोणता मार्ग वापरावा आणि स्वहिताचा विचार करून इतरांशी तसे ते वागत असतात. मूळ स्थितीतील विवेकशील माणसे एकमेकांचा द्वेष करत नाहीत कारण द्वेष हा परस्परांना अडचणीचा आणि नुकसानकारक असतो. या अवस्थेत जबरदस्तीऐवजी परस्पर संमतीने वा स्वइच्छेने करार व व्यवहार होत असतात. सर्वांच्या गरजा आणि हितसंबंध समान असल्यामुळे सर्व जण स्वतंत्र आणि समान पातळीचे असतात. अशा प्रकारच्या लोकांमध्ये सहकार्याची सहजभावना असते. या समाजात स्वत्व आणि स्व-हितसंबंधाचे संघर्ष या दोन्ही बाबी एकाचवेळी अस्तित्वात असतात. या समाजात विशिष्ट परिस्थितीत लोकांचे परस्परांशी सहकार्य होणे गरजेचे असते; कारण सामाजिक आणि राजकीय तत्त्वांच्या बाबतीत विविधता असणारी माणसे असतात याचा अर्थ रॉल्स समाजातील विविधता मान्य करतो.

अज्ञानाचा बुरखा (Veil of Ignorance) ही अमूर्त संकल्पना जॉन बोर्डल रॉल्स न्याय सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करण्यासाठी मांडतात. समाजातील आपले स्थान, आपला वर्ग, सामाजिक दर्जा, बौद्धिक क्षमता, ताकद इत्यादींविषयी ज्ञान नसते. व्यक्ती आपले हित आणि मानसिक कलाबाबत अज्ञानी असतो. आपल्या स्थानाबाबत अज्ञानी असणारे लोक सर्व माझ्यासारखेच आहेत ही धारणा करून घेईल आणि सर्वांना न्याय वागणूक मिळाली पाहिजे असे त्यांना वाटेल. या परिस्थितीला तो मूळ स्थिती (Original Position) असे म्हणतो. या स्थितीत प्रत्येक व्यक्ती समाजातील जे लोक सर्वांत कमीत कमी फायदा मिळणारे वा उपेक्षित लोक आहेत त्यांच्या

कल्याणासाठी प्रयत्न करतील. त्यामुळे सर्वांना आपले मत समानतेने मांडता येईल, रॉल्सने मांडलेल्या मूळ स्थितीतील समानतेची संकल्पना करारवादी विचारवंतांनी मांडलेल्या निसर्गावस्थेशी साधर्म्य साधणारी आहे. अज्ञानाच्या पडद्याआड राहणाऱ्या सर्व व्यक्ती सर्वांना समान मानतील, समान हितासाठी न्याय तत्त्वांना मान्यता देतील. मूळ स्थितीच्या आधारावर दोन न्याय तत्त्वांची मांडणी करतो. ही तत्त्वे त्यांच्या न्याय सिद्धान्ताची आधारभूत तत्त्वे मानली जातात.

**रॉल्सच्या न्यायकल्पनेत दोन तत्त्वे**

समाविष्ट करण्यात आली आहेत. ही दोन तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत-

**१)** व्यवहारात सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शक्य तितक्या अधिक स्वातंत्र्याचा वा मोकळिकीचा अधिकार असतो. पण या अटीवर की हे स्वातंत्र्य इतरांच्या तेवढ्याच स्वातंत्र्याशी सुसंगत असले पाहिजे.

**२)** एखाद्या सामाजिक व्यवहारात जर काही विषम रचना असेल तर तिच्यामुळे त्या व्यवहारात सहभागी असणाऱ्या प्रत्येकाचा लाभ होईल असे मानणे सयुक्तिक ठरेल, असे असेल तरच ती विषमता स्वीकारार्ह असते. नाही तर ती स्वैर असते. शिवाय अशा रचनेत जी अधिकारपदे व स्थाने इत्यादी अंतर्भूत असतील आणि ज्यांच्याशी हे विषम लाभ व भार निगडित असतील ती अधिकारपदे सर्वांना खुली असली पाहिजेत. येथे सर्वांना समान संधीचे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. प्रा. रेगे यांच्या मते या न्याय कल्पनेत स्वातंत्र्य, समता व व्यक्तीचे हित साधणे अभिप्रेत आहे.

जॉन बोर्डल रॉल्स सर्वसाधारण परिस्थितीत सामाजिक आणि आर्थिक विषमतेला मान्यता देत नाही परंतु उपेक्षित लोकांना फायदा मिळवून देणारी वा नुकसानकारक नसेल तर तो विषमतेला न्याय मानतो. अशा प्रकारे रॉल्स अमूर्त आणि गृहीतकाच्या आधारावर न्याय तत्त्वांची मांडणी करतो. अज्ञानाच्या बुरख्याखाली वावरणाऱ्या मूळ स्थितीतील मानव वरील न्याय तत्त्वांना मान्यता देतील. ती समाजाच्या मूळ चौकटीला लागू करावी लागतील. पहिले तत्त्व समानतेचे असल्याने लोकांच्या इच्छा-आकांक्षांना आकलन येऊन स्व-जाणीव विकसित होईल तर दुसऱ्या तत्त्वांच्या आधारावर सामाजिक संस्थांची उभारणी आणि लोकांच्या गरजा कशा पूर्ण करता येतील यांचे मार्गदर्शन मिळेल. याय तत्त्वांची निवड करता दोन तत्त्वे मूळ परिस्थितीत मानव मान्य करतील. ती तत्त्वं पुढीलप्रमाणे होत

जॉन बोर्डल रॉल्स यांनी सर्वांना संधीची समानता उपलब्ध करून देणाऱ्या या तत्त्वात सामाजिक विषमतेला छेद बसतो.पहिल्या तत्त्वात व्यक्ती विकासासाठी दिल्या जाणाऱ्या विविध स्वातंत्र्याचा समावेश होता तर दुसऱ्या तत्त्वांत समता निर्मितीसाठी विषमतेला मान्यता दिलेली आहे. दोन तत्वे सांगितलेली आहेत यामध्ये अनुक्रमे

**१. स्वातंत्र्य तत्त्व** (Liberty Principle) आणि

**२. लोकशाही समतेचे तत्त्व (Democratic equality**) रॉल्स यांनी या दोन्ही तत्त्वांपैकी पहिले तत्त्व निश्चित स्वरूपाचे मानतो. दुसरे तत्त्व अंमलात आणण्यासाठी पहिल्या तत्त्वावर बंधने घालणे अनुचित मानतो. व्यक्तीला जास्तीतजास्त स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सर्व व्यक्तींना समान स्वातंत्र्याचा उपभोग घेता आला पाहिजे. एकाचे स्वातंत्र्य दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यात अडथळा आणणार नाही हे पाहाणे म्हणजे 'न्याय' होय. त्याचे दुसरे तत्त्व जास्तीत जास्त लाभ देणारे आहे. त्याला तो लोकशाही समतेचे तत्त्व म्हणतो. व्यक्तींना आनुवंशिकतेमुळे प्राप्त होणारी विशिष्ट क्षमता ही सामाजिकदृष्ट्या मौल्यवान ठेवा असून त्यांचा उपयोग समाजातील सर्व व्यक्तींच्या विकासासाठी झाला पाहिजे. जन्मजात वा आनुवंशिक क्षमता प्राप्त लोकांना अधिक लाभ मिळविण्याचा अधिकार नाही तर त्यांनी या क्षमतेचा उपयोग समाजातील - उपेक्षित लोकांच्या कल्याणासाठी केला पाहिजे. याचा अर्थ जॉन बोर्डल रॉल्सने मांडलेल्या दोन न्यायतत्त्वांमुळे नैसर्गिक क्षमता आणि आनुवंशिकतेच्या आधारावर निर्माण होणारी विषमता नष्ट होईल. तो वैयक्तिक क्षमतांना सामाजिक ठेवा मानतो - आणि त्यांचा उपयोग वंचित वर्गाच्या कल्याणासाठी करावा हे अपेक्षित धरतो. रॉल्स सर्व स्वातंत्र्य, संधी, संपत्ती आणि दर्जा याबाबत समानता अपेक्षित करतो. सर्वांच्या वितरणात असमानता केवळ उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी योग्य मानतो. लोकशाही उदारमतवादात बहुसंख्यांकांचे हित पाहाण्याच्या दृष्टिकोनातून राज्यकारभार करावयाचा असल्याने त्या संदर्भात केलेले कायदेही बहुमतधारकांच्या हिताचेच असतात व त्यामुळे अल्पमतातील लोकांवर कायमच अन्याय होत रहातो.' या अन्यायाचे परिमार्जन कसे करावयाचे या विचारातून रॉल्स आपले न्यायाचे तत्त्वज्ञान (A Theory of Justice) मांडले आहे. व्यक्तीच्या वैयक्तिक कौशल्य, बुद्धिमत्ता आणि सामाजिक स्थानाला व्यक्तिगत न मानता सामाजिक मानतो आणि त्यांचा उपयोग उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी करण्याला 'न्याय' असे म्हणतो. ज्यांना नैसर्गिकरीत्या अधिक गुण किंवा क्षमतांचा लाभ झाला आहे त्यांनी त्यांचा उपयोग समाजातील दुर्दैवी आणि उपेक्षित लोकांच्या विकासासाठी केला पाहिजे. व्यक्तिगत क्षमता या सामाजिक मोलाचा ठेवा आहेत असे तो मानतो, कारण समाजात एकमेकांना प्रत्येक व्यक्ती सन्मानाने वागवत असते

लोकशाही व्यवस्था ही आदर्श व्यवस्था असेल व त्या व्यवस्थेत नागरिकांना न्याय मिळेल असे मानले जात होते. लोकशाही व्यवस्थेमध्ये कार्य करणाऱ्या राज्यात बहुसंख्येतील नागरिकांचे हक्क, अधिकार, स्वातंत्र्य सुरक्षित ठेवले जातात. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख लक्षात घेतले जाते. त्यानुसार कायदे केले जातात. या व्यवस्थेत बहुसंख्य लोकांना स्वातंत्र्य, संधी, आर्थिक बार्बीविषयक अधिकार व अन्य लाभ मिळतात. हे लाभ उपलब्ध करून देणे हे राज्याचे

उत्तरदायित्व म्हणून मान्य केले थोडक्यात, रॉल्सचे पहिले तत्त्व स्वातंत्र्याबाबत विवेचन करते. प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या स्वातंत्र्यात रॉल्सचा मूलभूत स्वातंत्र्यावर (Basic Liberties) भर आहे. तसेच सर्व व्यक्तींना समान स्वातंत्र्य उपभोगता आली पाहिजेत, कोणत्याही दोन व्यक्तींच्या स्वातंत्र्य क्षमतेत फरक असणार नाही. एकाचे स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येणार नाही हे पाहाणे म्हणजे न्याय. अशी स्थिती ज्या समाजव्यवस्थेत शक्य होते, ती न्याय्य समाजव्यवस्था होय, असे रॉल्सचे पहिले तत्त्व आहे. रॉल्स आपले दूसरे तत्त्व मांडताना म्हणतो की, 'सामाजिक आणि आर्थिक विषमता समाजात निर्माण झाली तर तिची व्यवस्था अशा त-हेने व्हावी की, (अ) त्या विषमतेमुळे समाजातील उपेक्षित स्तरावरील (least advantaged) लोकांचा फायदा झाला पाहिजे आणि (ब) अशी विषमता ज्या अधिकारपदांमुळे किंवा सामाजिक स्थानामुळे (दर्जा) होत असेल ती अधिकारपदे वा सामाजिक दर्जा मिळवण्याच्या संधी सर्वांना समानतेने उपलब्ध असल्या पाहिजेत.'असे विचार आपल्या न्याय विषय तत्वज्ञान आधारे जॉन रॉल्स मांडतात.

**जॉन बोर्डल रॉल्सप्रणीत दोन पर्याय**

खाजगी मालमत्तेवर आधारलेली लोकशाही व्यवस्था व उदारमतवादी समाजवादी व्यवस्था याबाबत वेगळया गोष्टी करू शकतील असे रॉल्सचे मत आहे. त्यांच्या मते या दोन्ही व्यवस्था

१). लोकशाही राजकारणासाठी घटनात्मक शासनव्यवस्थेची रचना निर्माण करतील.

२) सर्व नागरिकांना मूलभूत स्वातंत्र्याची हमी देतील. त्यात रास्त मूल्यावर आधारलेले राजकीय स्वातंत्र्य आणि रास्त स्वरूपात संधीची समानता अनुस्यूत असेल.

३) समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमतांचे नियमन परस्परहिताच्या तत्त्वाच्या आधारे करतील.

जॉन रॉल्सने दोन वेगवेगळे पर्याय सुचविले आहेत. त्या पर्यायात त्याचे स्वातंत्र्य व न्याय या दोन तत्त्वांना केंद्रीभूत मानून राजकीय व्यवस्थेची मांडणी केली आहे, त्यात खाजगी मालमत्तेचे तत्त्व व बाजारपेठा यांना नियमनाची मर्यादित भूमिका प्रदान केली आहे. त्याचप्रमाणे त्याने बहुपक्षीय लोकशाहीचा व घटनात्मक शासनसंस्थेचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी अडचणी येतील. त्यामुळे रॉल्सप्रणीत या व्यवस्थेचा विचार महत्वाचा आहे .

**३.२.३ जॉन बोर्डल रॉल्स यांचे स्वातंत्र्यविषयक विचार**

जॉन बोर्डल रॉल्स यांनी स्वातंत्र्य संकल्पनेचा केलेला पुरस्कार त्यांच्या उदारमतवादी विचारांशी सुसंगत आहे.यामध्ये Freedom म्हणजे स्वायत्तता (Self government) उत्तम स्वयं-शासन किंवा सार्वभौम स्वतंत्र राष्ट्र राज्य (national state) ही कल्पना अभिप्रेत आहे. तर दुसऱ्या

बाजूने त्याचा अर्थ स्वतःस वाटणाऱ्या किंवा इच्छा असणाऱ्या गोष्टी साध्य करून घेण्यासाठी लागणारी साधारण क्षमता (overall ability) असाही घेतला जातो. समाजाने मान्य केलेले स्वातंत्र्याच्या अधिकाराचे तो समर्थन करतो. तो स्वातंत्र्याच्या मूल्याला सामाजिक व आर्थिक समतेपेक्षा जास्त महत्त्व देतो. स्वातंत्र्य शब्दात Liberty आणि Freedom या दोन संकल्पनांचा समावेश आहे. बर्लिन, क्रॅस्टनसारखे विचारवंत दोन्ही शब्द समानार्थी मानतात परंतु क्रॅस्टनच्या मते, Liberty हा शब्द कायदेविषयक आणि राजकीय बाबतीत वापरला जातो तर Freedom हा शब्द तत्त्वज्ञान आणि सर्वसाधारणपणे समाजव्यवस्थेत वापरला जातो. 'Liberty' आणि 'Freedom' या स्वतंत्र अर्थ व्यक्त करणाऱ्या संकल्पना असल्या तरी त्या परस्परांपासून पूर्णपणे भिन्न नसून परस्पर संबंधित आहेत. Freedom शब्दात स्वयंशासन किंवा सार्वभौम स्वतंत्र राज्य हा अर्थ अभिप्रेत आहे त्यासोबत स्वतःच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करून घेण्याची क्षमता, असाही होत असतो.

जॉन बोर्डल रॉल्स यांनी बर्लिनच्या व्यक्तिविविधतेवर आधारलेल्या स्वातंत्र्याला मान्य करतो; परंतु, समाजाचा कालबद्ध विकासाचा कार्यक्रम आखताना विविध मूल्यांपैकी कोणत्या मूल्यांना प्राधान्य द्यावे व त्या मूल्यांच्या प्राधान्यावर आधारित इतर मूल्यांची सांगड कशी घालावयाची हा आणखी एक प्रश्न आहे या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी रॉल्स आपल्या स्वातंत्र्यविषयक विचारांची मांडणी करतो. तो व्यक्तिविविधतेला निश्चितपणे मान्यता देतो तसेच विविध व्यक्तींच्या विविध इच्छाशक्तींनाही मान्यता देतो. मात्र, विविध मूल्यात स्वातंत्र्य मूल्याला अग्रक्रम देतो. सामाजिक आणि आर्थिक समता या मूल्यांहून स्वातंत्र्य मूल्याला प्राधान्य देतो. उदारमतवादी तत्त्वज्ञानात विविध विचार आणि राजकीय प्रणालींच्या लोकांना एकत्र आणण्याचा वा त्यात एकसंघता साधण्याचा राज्याचा प्रयत्न असला तरी विशिष्ट नीतीतत्त्वांना प्राधान्य दिलेले असते; ते तत्त्व म्हणजे 'स्वातंत्र्य' होय, असे रॉल्स मानतो. तो न्यायाचे तत्त्वज्ञानाची मांडणी करताना मूलभूत स्वातंत्र्याची यादी देतो. विचारस्वातंत्र्य, विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य, व्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यक्तीचे नागरी स्वातंत्र्य राजकीय स्वातंत्र्यासाठी नष्ट करता येणार नाहीत. याउलट, त्या स्वातंत्र्याचे बीजारोपण करण्यासाठी आणि संरक्षणासाठी राज्याने प्रयत्न केला पाहिजे. राजकीय क्षेत्रातील समान सहभाग स्वातंत्र्यामुळे वरील स्वातंत्र्याचा त्याग केला जाऊ नये किंवा बंधने आणून त्यांचा संकोच करण्याचा प्रयत्न केला जाऊ नये असे त्याला वाटते.

स्वातंत्र्य संकल्पनेचे 'सकारात्मक स्वातंत्र्य' आणि 'नकारात्मक स्वातंत्र्य' असे दोन प्रकार केले जातात. नकारात्मक स्वातंत्र्यात बंधनाचा अभाव हा विचार अंतर्भूत असतो. व्यक्तीच्या कार्यक्षेत्रात कोणताही हस्तक्षेप न होता अपेक्षित ध्येय साध्य करण्याचे स्वातंत्र्य असते अर्थात स्वयंशासनाने व्यक्ती काही बंधने आपल्यावर लादू शकते. नकारात्मक स्वातंत्र्याचे हॉब्ज, लॉक, माँटेस्क्यू, हर्बर्ट

स्पेन्सर, जे.एस. मिल, हायेक इत्यादी विचारवंतांनी केलेले आहे. सकारात्मक स्वातंत्र्यात समाज आणि राज्य व्यवस्थेने लादलेल्या उचित बंधनांना मान्यता देऊन त्यांचा उपभोग घेणे अपेक्षित असते. रूसो, कांट, हेगेल, ग्रीन हे विचारवंत सकारात्मक स्वातंत्र्याचे समर्थन करतात. इसाई बर्लिन आपल्या 'द टू कन्सेप्ट्स ऑफ लिबर्टी' या ग्रंथात वरील स्वातंत्र्याच्या दोन्ही प्रकारांचे विश्लेषण केलेले आहे. त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे व्यक्तित्त्व आणि मानवी विविधतेशी निगडित असते. प्रत्येक माणूस निसर्गतःच भिन्न असतो. प्रत्येकाचे विचार, क्षमता, साध्ये आणि आयुष्याबद्दलच्या आशा आकांक्षा भिन्न भिन्न असतात; म्हणून प्रत्येक व्यक्तीस पर्यायनिवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे आणि त्यांच्या निवडप्रक्रियेत कोणताही अडथळा वा बंधन असता कामा नये, असा नकारात्मक स्वातंत्र्याचा अर्थ सांगितलेला आहे. बर्लिन सकारात्मक स्वातंत्र्य मानवी प्रगतीसाठी आवश्यक मानतो. परंतु, त्यांच्या गैरवापरास विरोध करतो.

**जॉन बोर्डल रॉल्सप्रणीत स्वातंत्र्य विचार तीन पैलू**

रॉल्स स्वातंत्र्याचा विचार तीन पैलूंच्या माध्यमातून करतो.

१. कोणती व्यक्ती स्वतंत्र आहे

२. कोणत्या बंधनापासून व्यक्ती स्वतंत्र आहे

३. व्यक्तींच्या स्वातंत्र्याच्या कक्षा कोणत्या आहेत

या तीन वैशिष्ट्यांचा विचार करून त्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. प्रथम तत्त्वानुसार सर्वांना समान स्वातंत्र्य असले पाहिजे आणि त्या स्वातंत्र्याचा उपभोग सर्वांना समानतेने घेता आला पाहिजे. समाजातील असमानतेमुळे स्वातंत्र्याच्या प्रत्यक्ष वापरावर परिणाम होतो परंतु त्यामुळे समान स्वातंत्र्याच्या तत्त्वाला बाधा येत नाही. समान स्वातंत्र्याच्या तत्त्वास सहमती प्राप्त होऊन त्यांचा अंतर्भाव संविधानात केला जातो तेव्हा खऱ्या अर्थाने समान सहभागाचे तत्त्व प्रस्थापित होते. जनतेने निवडून दिलेली संसद ही लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च असते. या संस्थेकडून लोकांना विविध प्रकारची स्वातंत्र्यं दिली जातात. मात्र, या संस्थेने निव्वळ स्वातंत्र्य देण्यापुरती आपली जबाबदारी न मानता त्यांच्या संरक्षणासाठी व्यापक प्रयत्न केले पाहिजे. स्वातंत्र्य हा घटनात्मक अधिकार न राहता प्रत्यक्ष तत्त्व म्हणून समाजव्यवस्थेत रुजण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी संसदेने प्रयत्न केले पाहिजे. सर्व नागरिकांना समान राजकीय सत्ता असली पाहिजे; म्हणजेच सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचा एक भाग असलेल्या व्यक्तीला समान स्वातंत्र्य असले पाहिजे. त्यासाठी रॉल्स काही महत्त्वपूर्ण सूचनादेखील करतो. राजकीय पक्षांनी निवडणूक निधी वा प्रचार खर्चासाठी उद्योग वा भांडवलावर अवलंबून असता कामा नये तरच ते समान स्वातंत्र्याची प्रस्थापना करू शकतील. लोकशाही व्यवस्थेत उत्पादनाची साधने खासगी मालकीची

असतात. त्यामुळे समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. आर्थिक विषमतेच्या वातावरणात समान स्वातंत्र्य आणि समान सहभागाचे तत्त्व प्रत्यक्षात येणे अशक्य असते. त्यामुळे रॉल्स लोकशाही व्यवस्थेत संपत्तीचे योग्य वाटप झाले पाहिजे याचे समर्थन करतो. मर्यादित प्रमाणात विषमतेचे समर्थन करून गरीब-श्रीमंत वर्गात फार मोठे अंतर असू नये अन्यथा समान स्वातंत्र्य व सहभागाचे तत्त्व मृगजळ ठरेल. रॉल्सच्या मते लोकांनी निवडून दिलेली प्रतिनिधीमंडळस्वरूपी संसद ही सर्वोच्च संस्था आहेच. शिवाय या संसदेकडून विविध स्वातंत्र्ये दिली जातात. त्यांची जपणूक झाली पाहिजे, आणि ती केवळ तत्त्वतः मान्य न करता ती प्रत्यक्षात आणण्यासाठीचे प्रयत्न झाले पाहिजेत. या संदर्भात रॉल्स आपले तत्त्व मांडतो. राजकीय पद्धतीनुसार सर्व नागरिकांना समान राजकीय सत्ता असली पाहिजे. म्हणजेच सामाजिक किंवा राजकीय व्यवहारात भागीदार असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस समान स्वातंत्र्य असले पाहिजे. याकरता रॉल्स काही महत्त्वाच्या गोष्टींकडे निर्देश करतो. तो म्हणतो, 'राजकीय पक्षांनी आपल्या आर्थिक व्यवहारांसाठी खाजगी उद्योग किंवा मक्तेदारी यावर अवलंबून असता कामा नये. ज्या लोकशाही भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असतात, तसेच मालमत्ता आणि संपत्ती यांची खाजगी मालकी अभिप्रेत असते, त्या व्यवस्थेत संपत्तीचे योग्य वाटप असले पाहिजे. गरीब-श्रीमंत वर्गाची दरी मोठी असता कामा नये. तरच समान स्वातंत्र्य व समान सहभागाचे तत्त्व अंमलात येणे शक्य असे रॉल्स स्वातंत्र्य संकल्पनेबाबत विचार व्यक्त करतात.

### ३.२.४ जॉन रॉल्सचे समताविषयक विचार :

जॉन बोर्डल रॉल्सची समतेची संकल्पना ही ख्रिश्चन मानवतावादी दृष्टिकोनातून घेतो ती वस्तुनिष्ठ आणि उदारमतवादी विचारधारेशी निगडित आहे. मानवतावादी दृष्टिकोन म्हणजे सर्वांची समान क्षमता किंवा सर्वांमध्ये समान गुण असतात असा नव्हे. तर परमेश्वराने निर्मिलेल्या या जगात सर्व माणसांमध्ये नैतिक समानता असते व प्रत्येक व्यक्तीला काही सामान्य नियंत्रणातूनच कालक्रमणा करावी लागते. समतेवर आधारित समाजव्यवस्थेत लोकांचे परस्परसंबंध सौहार्दाचे असतील आणि त्यांच्या परस्परसंबंधातून त्यांच्या सर्वांच्याच व्यक्तिगत विकासाला वाव मिळेल. पण अशी परिस्थिती कशी निर्माण होणार याकरिता रॉल्स काही महत्त्वाच्या सूचना करतो. लोकशाही तत्त्वांच्या आधारे समाजाचे परिवर्तन आणि सत्तेचे विकेंद्रीकरणाची प्रक्रिया शक्य होते. समाजातील बुद्धिमान लोकांनी आणि विशेष क्षमता असलेल्या लोकांनी आपल्या बुद्धीचा आणि विशिष्ट क्षमतेचा उपयोग समाजाच्या, तळागाळातील वर्गासाठी,त्यांच्या भल्यासाठी करावा. रॉल्सने आपली ही समतेची कल्पना आपल्या न्यायांवर आधारित तत्त्वव्यूहात उपयोगात आणली आहे.

त्यांनी न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी गृहीत धरलेल्या धारणा तत्त्वावर आधारलेली आहे. समाजव्यवस्थेतील विषमता तो मान्य करतो. विषमता नष्ट करण्यासाठी साम्यवाद, समाजवादसारख्या विचारधारेच्या माध्यमातून कृत्रिम व औपचारिक पद्धतीने समता निर्मितीचा प्रयत्न घातक ठरेल असे मत व्यक्त करतो. समाजातील विषमता मान्य करून प्रगत समाज दीर्घस्थैर्याची समानता निर्माण करू शकेल हा विश्वास व्यक्त करतो. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेमध्ये आढळून येणाऱ्या स्पर्धात्मक भांडवलशाही आणि खासगी मालमत्तेचे अस्तित्व असलेल्या व्यवस्थेत सामाजिक सहकार्य आणि परस्परसहकार्य यांचा आधारावर समतेची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न करतो. समाज आर्थिकदृष्ट्या प्रगत होत असताना दुर्बल घटकांचा फायदा होईलच पण त्यासोबत श्रीमंत वर्गाच्या राहणीमानातही फरक पडणार नाही अशी व्यवस्था सूचवून समता आणि स्वातंत्र्य या परस्परविरोधी मूल्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्याच्या विचारातून व्यक्त होतो.

रॉल्स काही उपाययोजना आणि सूचना मांडतो. समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी लोकशाही तत्त्वांच्या आधारावर समाजाचे परिवर्तन केले पाहिजे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया व्यापक प्रमाणात अंमलात आणून राजकीय निर्णय प्रक्रिया आणि सार्वजनिक पदप्राप्तीत जास्तीत जास्त व्यक्तींना संधी प्राप्त करून दिली जावी. समाजातील क्षमतावान आणि बुद्धिवान लोकांनी आपली बुद्धी आणि क्षमतेचा उपयोग समाजातील वंचित वा मागासलेल्या वर्गांच्या कल्याणासाठी करावा. याचा अर्थ रॉल्स यांनी समतेची संकल्पना न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्मितीतील एक पाऊल या अर्थाने मांडलेली आहे. त्यामुळे तो समाजव्यवस्थेत पूर्ण समता निर्माण करण्याचा विचार मांडत नाही.धनिक आणि बुद्धिमान तसेच विशिष्ट क्षमता लाभलेल्या लोकांनी आणि समाजातील उपेक्षित, अविकसित किंवा गरीब वर्गातील लोकांनी परस्पर सहकार्याने ही असमता दूर करण्याचा प्रयत्न करावा, हा रॉल्सच्या न्यायविषयक तत्त्वज्ञानाचा प्रमुख घटक आहे.

### ३.२.५ जॉन बोर्डल रॉल्सचे सुव्यवस्थित समाजरचनेबद्दलचे विचार :

सामाजिक संस्थेचे प्रथम उद्दिष्ट न्याय हे असले पाहिजे. रॉल्स म्हणतो, 'लोकांनी आपल्या परस्परांतील हितरक्षणासाठी एकत्र येऊन सहकारी भावनेने नांदणे म्हणजे समाज.' (Society is a cooperative venture among individuals for their mutual advantage) समाजामध्ये एकमेकांशी व्यवहार करताना व्यक्ती आपल्या हिताचा विचार करून जसे इतरांशी सहकार्याने वागते त्याचप्रमाणे काही वेळा आपापसातील स्पर्धा व संघर्ष यांनाही तिला तोंड द्यावे लागते. रॉल्सच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास, 'समाज म्हणजे परस्पर सहकार्य आणि संघर्ष यांचा परस्परहितकारक मिलाफ होय.' रॉल्स न्याय सिद्धान्ताची मांडणी केल्यानंतर त्या सिद्धान्तातील दोन न्याय तत्त्वांवर आधारलेल्या सुव्यवस्थित समाजरचनेबद्दल विचार अंगिकारलेल्या 'सुव्यवस्थित समाजरचनेची'

संकल्पना मांडतो. आपापल्या हितरक्षणासाठी एकत्र येऊन सहकार्य भावनेने परस्परांशी सहकार्याने राहणे म्हणजे 'समाज' होय. व्यक्ती समाजव्यवस्थेचा एक भाग असला तरी ती आपल्या वैयक्तिक हिताचा विचार करून इतरांना सहकार्य करीत असतो. काही वेळेस आपापसांतील हितामुळे स्पर्धा व संघर्ष उद्भवत असतो; त्यामुळे समाज म्हणजे परस्पर सहकार्य आणि संघर्षाचा मिलाफ असतो. व्यक्ती समाज व्यवस्थेचा एक घटक असला तरी आपले हित साध्य होईल अशा समाजव्यवस्थेला मान्यता प्रदान करत असतो. प्रत्येक व्यक्ती आत्मकेंद्रित, स्वार्थी असते. त्याबरोबर विवेकशीलदेखील असते. स्व-फायद्याचा निर्णय घेत असताना व्यक्ती विवेक बुद्धीने वागत असते. स्व-हिताचा निर्णय घेताना व्यक्ती सामूहिक हिताचादेखील विचार करत असते. व्यक्ती स्वभावातील या वैशिष्ट्यांमुळे ती समाजाचा एक घटक म्हणून वागत असते.

रॉल्सच्या मते, सामाजिक संस्थांच्या रचनेची उभारणी करताना न्यायाचा दोन तत्त्वांचा आविष्कार झाला पाहिजे; कारण न्याय हे सामाजिक संस्थांचे प्राथमिक उद्दिष्ट असते. रॉल्स सामाजिक संस्थांचा मूलभूत चौकट, सामाजिक व्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीची कृती आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार या तीन बाबींना न्यायतत्त्वे लागू करतो. सामाजिक संस्थात्मक रचनेत सर्व लोकांना मूलभूत स्वातंत्र्याचा समान हक्क असला पाहिजे. तसेच सुव्यवस्थित समाजरचनेत कोणत्या प्रकारच्या विषमतेचे अस्तित्व असता कामा नये. या समाजरचनेत न्यायाची दोन मार्गदर्शक तत्त्वे असली पाहिजेत. न्यायतत्त्वामुळे सर्वांचे हित साधले गेले पाहिजे आणि उपेक्षित स्तरावरील व्यक्तींनाही त्यांचा लाभ मिळाला पाहिजे. रॉल्सच्या मते, समाजातील संस्थांची रचना अशी असली पाहिजे की ज्यात त्याने मांडलेल्या न्यायाच्या दोन तत्त्वांचा आविष्कार झाला असला पाहिजे, कारण वर उल्लेखलेल्याप्रमाणे न्याय हे सामाजिक संस्थांचे प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे. ही न्यायतत्त्वे तो खालील तीन प्रकारच्या बाबींना लावतो.

१) सामाजिक संस्थांचा मूलभूत ढाचा

२) समाजव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीची कृती

३) आंतरराष्ट्रीय व्यवहार

वरील तीन बाबींपैकी रॉल्स सामाजिक संस्थांना प्राधान्य देतो. कारण न्याय हे - सामाजिक संस्थांचे उद्दिष्ट असले पाहिजे. संस्थात्मक रचनेचा विचार करताना रॉल्स न्यायाचे पहिले तत्त्व समतेचे तत्त्व लागू करतो. तो म्हणतो की, सर्व लोकांना मूलभूत स्वातंत्र्याचा समान हक्क असेल अशी संस्थात्मक रचना असली पाहिजे. त्याच्या सुव्यवस्थित समाजाच्या संकल्पनेत कोणत्याही प्रकारच्या विषमतेला या संदर्भात थारा नाही. रॉल्सच्या मते, या समाजरचनेत न्यायाची दोन तत्त्वे ही मार्गदर्शक तत्त्वे असली पाहिजेत आणि अशा समाजरचनेत न्यायामुळे साधले जाणारे हित हे सर्वांपर्यंत पोहोचले

असले पाहिजे. त्यातल्या त्यात समाजातील उपेक्षित स्तरावरील लोकांपर्यंत - त्याचा लाभ मिळाला पाहिजे.

अशा त-हेच्या समाजव्यवस्थेची संकल्पना मांडताना रॉल्स प्रामुख्याने व्यक्तीच्या विवेकावर (rationality) भर देतो. रॉल्सच्या मते, ज्या वेळी मूलभूत स्थितीत (original position) व्यक्ती अज्ञानाच्या बुरख्याखाली (veil of ignorance) न्यायाच्या मूलतत्त्वांचा शोध घेतील, त्या वेळी त्यांचा मार्गदर्शक हा त्यांचा विवेकच असेल. जरी या न्यायतत्त्वांवर आधारित कराराचा हेतू व्यक्तिगत स्वार्थ असेल, तरीही अशा न्यायाधारित व्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी व्यक्तींनी विवेकाचा उपयोग करावा. अशी 'सुव्यवस्थित समाजव्यवस्था' प्रस्थापित करणे हेच व्यक्तीचे महत्त्वाचे कर्तव्य असले पाहिजे.

न्यायाधारित करार प्रस्थापित केल्यावर, 'न्याय्य घटनेचा' शोध घेण्याचे काम व्यक्तींना करावे लागते. न्याय्य घटनेचा अर्थ सांगताना रॉल्स म्हणतो की ज्या घटनेद्वारे 'न्याय्य समाजाची परिणती' होते ती न्याय्य घटना होय. या न्याय्य घटनेतील संस्था व कार्यपद्धती हीही न्यायावर आधारलेली असली पाहिजे. अशा त-हेची कार्यपद्धती म्हणजे राजकीय प्रक्रिया आणि यातून निर्माण होणारे फलित म्हणजे कायदा होय. ही राजकीय प्रक्रिया न्याय्य असण्यासाठी त्यात मूलभूत स्वातंत्र्याचा अंतर्भाव असला पाहिजे. विचारस्वातंत्र्य (liberty of thought), व्यक्तिस्वातंत्र्य (liberty of person) आणि समान स्वातंत्र्य (equal liberty) यांचा मूलभूत स्वातंत्र्यात समावेश असतो. रॉल्सच्या न्याय्य ची संकल्पना लोकशाही व्यवस्थेत आविष्कृत होत असते.या घटनासमितीद्वारे सुव्यवस्थित समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी नियमावली (set of rules) तयार केली जाते. अशा समाजव्यवस्थेतील व्यक्ती दोन न्यायतत्त्वांना मान्यता देतात आणि त्यातून अपेक्षित कर्तव्ये पार पाडतात असे रॉल्स म्हणतो. या समाजव्यवस्थेत व्यक्ती स्वतःहून आपल्या कर्तव्यांचे पालन करतील व जबाबदाऱ्या विभागून घेतील. कारण त्यांनी तसे मान्य केलेले असते. त्यामुळे दंडसत्तेची (coercive power) गरज भासणार नाही. परंतु तरीही आत्मकेंद्री, स्वार्थी मानवी स्वभाव विचारात घेऊन रॉल्स दंडसत्तेचे महत्त्व अधोरेखित करतो. समाजामध्ये वावरताना प्रत्येक व्यक्तीला अशी भीती वाटत असते की इतर व्यक्ती न्याय्य समाजव्यवस्थेतील अपेक्षित कर्तव्ये कदाचित पार पाडणार नाहीत. त्यामुळे अशा त-हेची एकमेकांविषयीची संशयी वृत्ती आणि स्पर्धा जर नियंत्रणात ठेवल्या नाहीत तर त्यातून त्या व्यवस्थेलाच धोका होण्याची भीती असते आणि म्हणूनच रॉल्सच्या मतानुसार अशा त-हेच्या विघातक वृत्ती नियंत्रणात ठेवण्यासाठी दंडसत्तेची आवश्यकता आहे. सुव्यवस्थित समाजातील (well-ordered society) प्रत्येक व्यक्ती न्यायाचीतत्त्वे मान्य करतील आणि त्यानुसार वागतील, तसेच या समाजव्यवस्थेतील मूळ संस्था (Basic institutions) न्यायतत्त्वांचे पालन

करतील अशी रॉल्सची अपेक्षा आहे. याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तीला न्यायाच्या तत्त्वानुसार वागण्याची प्रबळ इच्छा असेल. तसेच कोणाच्याही मनात अशी भीती असणार नाही, की माझे हित डावलले जाईल. 'सुव्यवस्थित समाजा'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची स्थिरता होय. या समाजव्यवस्थेत परस्परांचे हितसंबंध जोपासण्याची व सामूहिक जबाबदारीने वागण्याची व्यक्तीची इच्छा असल्यामुळे व्यक्तिगत पातळीवरील संघर्षांना वाव मिळणार नाही व त्यामुळे स्थिर समाजाची प्रतिष्ठापना होऊ शकेल. या विचारातूनच रॉल्स आपले आज्ञाभंगाचे तत्त्वज्ञान मांडतो.

**३.२.६ जॉन बोर्डल रॉल्सचे नागरी आज्ञाभंगाबाबतचे विचार (' on Civil Disobedience):**

जॉन बोर्डल रॉल्सनी उदारमतवादी घटनात्मक लोकशाहीमध्ये 'नागरी आज्ञाभंगा'चे प्रसंगही येऊ शकतात असे मानतो. हॉब्जने याबाबत असे विचार मांडले आहेत की नागरी आज्ञाभंगाचा अवलंब करणारे नागरिक हे स्वेच्छेने काही त्रास सहन करून कायदा मोडतात. त्याचे कारण राजकीय अन्याय हे असते. परंतु अन्यथा हे नागरिक कायद्याच्या अधिराज्याला मान्यता देणारे असतात. लॉक म्हणतो अन्यायी सरकारविरुद्ध नागरी आज्ञाभंगाचा मार्ग स्वीकारणे हा नागरिकांचा हक्क आहे. थॉमस जेफरसनच्या मते, लोकशाही बहुमतावर आधारलेली व्यवस्था असली तरी त्या व्यवस्थेत अल्पसंख्यांकांच्या हक्क आणि मतांबद्दल जागरूकता असली पाहिजे. त्याच्या मते, शासन, अतिउत्साही पत्रकारिता आणि सर्वसामान्य नागरिकांची मते यामुळे अल्पमतधारकांच्या हक्कांची आणि मताची पायमल्ली होत असते.

जॉन रॉल्स म्हणतो, की काही प्रसंगी सुसंघटित समाजातही न्यायाची पायमल्ली होताना दिसते. अशा वेळी नागरी आज्ञाभंगाच्या तत्त्वाचे तो समर्थन करतो. तो लोकशाही समाजव्यवस्थाच गृहीत धरतो कारण केवळ लोकशाही व्यवस्थेतच आज्ञाभंगाचा मार्ग अनुसरता येतो. नागरी आज्ञाभंग म्हणजे प्रचलित कायद्याचा हेतुपूर्वक भंग करणे, तो मोडणे. हा उपाय नागरिक सरकारी योजनेतील एखाद्या महत्त्वाच्या मुद्यांवर होणाऱ्या चुकीकडे लक्ष वेधण्याकरता योजतात. यात नागरिकांना योजनेत किंवा कायद्यात त्यांना योग्य वाटणारा बदल अपेक्षित असतो. नागरी समाजव्यवस्थेतील सर्वांचे हित या कसोटीवर अशी उपाययोजना समर्थनीय ठरू शकते आणि ती नीतितत्त्वांतही बसते, अर्थात ही राजकीय कृती असते. यात कोणत्याही प्रकारचे व्यक्तिगत किंवा व्यक्तिगटांचे हित सामावलेले नसते. काही योजना वा कायद्यामध्ये शासनकर्त्यांच्या हातून लोकशाही मूल्यांची पायमल्ली होते, अशा वेळी त्यांचे लक्ष वेधण्यासाठी कायद्याच्या कार्यकक्षेत राहून नागरिकांनी स्वीकारलेला हा राज्यव्यवस्थेवर दबाव आणण्याचा मार्ग असतो. परंतु, रॉल्सच्या मते, आज्ञाभंगाच्या तत्त्वामुळे कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण होण्यास राज्यकर्ते जबाबदार असतात. त्यांनी अयोग्य व अन्यायकारक कायदे केले नसते तर जनतेने या तत्त्वांचा वापर केला

नसता; म्हणून कायदा आणि सुव्यवस्थेचे उत्तरदायित्व शासनाकडे आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा आधार घेऊन जनतेस अन्याय सहन करण्यास सांगणे हे उदारमतवादी लोकशाहीच्या विरुद्ध तत्त्व आहे म्हणून रॉल्स कायदा आणि सुव्यवस्थेचे उत्तरदायित्व शासनाकडे सोपवितो आणि नागरी आज्ञाभंगाच्या तत्त्वाचे समर्थन करतो.

लोकशाही मूल्यांची पुनर्स्थापना व्हावी या शुद्ध हेतूने हा नागरी आज्ञाभंगाचा मार्ग अवलंबला जातो. अल्पमतातील लोकांचे हक्क डावलले जात असतील किंवा त्यांची मते विचारात घेतली जात नसतील तर बहुमतातील लोकांचे लक्ष वेधण्यासाठी हा मार्ग अवलंबल्यास ते रॉल्स समर्थनीय मानतो. बहुमतातील लोक अल्पमतधारकांवर अन्याय करण्याची शक्यता गृहीत धरून रॉल्स त्याला मान्यता देतो. विशेषतः त्याच्या मते, अशा शक्यता धार्मिक अल्पमतातील लोकांबाबत होण्याची अधिक असते. रॉल्स म्हणतो की, सुसंघटित समाजव्यवस्थेतही अन्याय्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी सर्व सनदशीर मार्गांचा आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी उपयोग होत नाही असे दिसते. त्यावेळी अल्पमतातील लोकांनी त्यांचे हक्क मिळवण्याकरता किंवा अन्याय दूर करण्याकरता नागरी आज्ञाभंगाचा मार्ग अवलंबल्यास तो समर्थनीय ठरेल. अशा त-हेने नागरी आज्ञाभंगाच्या उपायामुळे सार्वजनिक सुरक्षा आणि कायदा यांना धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती उद्भवल्यास जे सत्ताधीश आणि जी शासनव्यवस्था चुकीच्या निर्णयास जबाबदार असेल, त्यांचे हे उत्तरदायित्व असेल, जे लोक आज्ञाभंग करतात ते नव्हेत असे रॉल्सचे मत व्यक्त करतात .

**रॉल्सच्या विचारांचे मूल्यमापन**

जॉन बोर्डल रॉल्स यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय संकल्पनेची नव्याने चर्चा सुरू केली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील प्रमुख विचारवंत मानला जातो. त्यांच्या न्यायविषयक सिद्धान्ताने न्याय संकल्पनेला मध्यवर्ती मानून रॉल्स यांनी आपल्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवाद, अनुभववाद आणि विचारप्रणाली अंत इत्यादी अनेक विचारधारेच्या प्रभावातून राजकीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात मरगळ आलेली होती. रॉल्सच्या दर्जेदार लेखनामुळे राजकीय क्षेत्रात उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले. क्लार्क वुल्फच्या मते, 'A Theory of Justice' हे पुस्तक राजकीय तत्त्वज्ञानाला वळण देणारे ठरले. रॉल्सचे लेखन राजकीय तत्त्वज्ञानातील मूलभूत तत्त्वांची चर्चा करणारे आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानातील उणिवा मान्य करूनही त्यांचे सामाजिक न्याय क्षेत्रातील योगदान दुर्लक्षिता येणार नाही. न्यायविषयक सिद्धान्तातून उदारमतवादी विचारात मोलाची भर पडलेली आहे. स्वातंत्र्य आणि समता या राज्यशास्त्रातील

कळीच्या संकल्पना मानल्या जातात. या संकल्पनेच्या आधारावर जगाची भांडवलशाही आणि समाजवाद व साम्यवाद या गटात विभागणी झालेली होती.

रॉल्सच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे योगदान महत्वाचे असले तरी त्यांच्या विचारावर अनेक विचारवंतानी टीका केली आहे.

१. रॉल्सने हॉब्ज, लॉक व रूसोचा करारवादी सिद्धान्त, कांटचा आदर्शवाद, बेंथॅमचा उपयुक्ततावाद, मार्क्सचे समताधिष्ठित तत्त्वज्ञान यांची सरमिसळ करून न्यायाचे तत्त्वज्ञान मांडलेले आहे.

२. रॉल्सचे तत्त्वज्ञान वास्तववादी नसून अमूर्त पातळीवरचे असल्याने मूलभूत स्वरूपाचे नाही अशी टीका केली जाते.

३. रॉल्सचा न्यायविषयक सिद्धान्त मूलभूत स्वरूपाचा नसून बेंथमच्या उपयुक्ततावादातील उणिवा दूर करण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजना आहेत, अशीही टीका केली जाते.

४. रॉल्स आपल्या तत्त्वज्ञानात समतेपेक्षा स्वातंत्र्य संकल्पनेला अधिक प्राधान्य देतो, अशीही टीका केली जाते.

रॉल्सच्या तत्त्वज्ञानाची मांडणी कोणत्याही प्रकारे मूलभूत स्वरूपाची नाही अशी रॉल्सवर टीका केली जाते. सेनच्या मते, रॉल्सच्या तत्त्वज्ञानाची मांडणी ही मूलभूत स्वरूपाची नसून ती बेंथेमच्या उपयुक्ततावादातील त्रुटींची दुरुस्ती या स्वरूपात आहे. अनेक टीकाकार रॉल्सला भांडवलशाहीचा पाठिराखा (Champion of Capitalism) असे मानतात. त्याने आपल्या तत्त्वज्ञानातील सामाजिक न्याय या संकल्पनेची उभारणी समाजवादी विचारसरणीशी समांतर अशी मांडली. समाजाच्या निम्न-स्तरावरील लोकांचा तो विचार करतो. परंतु त्याच्या तत्त्वज्ञानात कोठेही अतिरिक्त आर्थिक संचयाला नियंत्रण घातले पाहिजे असे म्हटले नाही. क्षमतेवर आधारित विषमतेचे तो समर्थन करतो. रॉल्सचे राजकीय विचारांच्या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान असून त्याने आपल्या सामाजिक न्यायावर आधारित सुसंघटित समाजाचे अमूर्त पातळीवरील स्वप्नांमुळे राजकीय विचारांना चालना दिली.

### ३.३ सारांश

जॉन रॉल्स आपल्या सामाजिक न्याय (social justice) या संकल्पनेच्या संदर्भात अशा आदर्श समाजरचनेचा विचार करतो की, ज्यात काही न्याय्य तत्त्वांच्या आधारे व्यक्ती आणि सामाजिक संस्था आपापली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या निश्चित करून त्यानुसार व्यवहार करतील व त्यामुळे अन्यायाची परिस्थिती निर्माण होणार नाही. समान स्वातंत्र्याचे असून त्यामुळे समाजातील लोकांच्या इच्छा-आकांक्षांना आकार येईल आणि लोकांमध्ये स्व-जाणीव निर्माण होईल, आपण विकासाचा कोणता मार्ग स्वीकारायचा याविषयी लोकांत जागरूकता येईल. त्यांना अपेक्षित

शासनप्रणाली ही उदारमतवादी लोकशाही आहे. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत नागरी आज्ञाभंगाचा वापर करता येतो. कारण सुव्यवस्थित समाजात देखील न्यायाची पायमल्ली होते. नागरी आज्ञाभंगात प्रचलित कायद्याचा मुद्दाम किंवा हेतूपूर्वक भंग करणे वा मोडणे अपेक्षित असते. सरकारने केलेल्या चुकीच्या कृतीकडे लक्ष वेधण्यासाठी किंवा सरकारची चूक निदर्शनात आणून देण्याचा हेतू असतो. प्रस्थापित कायद्यात असलेल्या त्रुटी दूर करून योग्य त्या उपाययोजना शासनाने कराव्यात हा आज्ञाभंगाच्या तत्त्वाचा मध्यवर्ती गाभा असतो. रॉल्सच्या मते, न्यायतत्त्वानुसार सर्वांचे हित या गृहीतकानुसार विचार केल्यास नागरी आज्ञाभंगाची तत्त्वे समर्थनीय आणि नैतिकदृष्ट्या योग्य ठरतात.

रॉल्सच्या सुसंघटित समाजव्यवस्थेत सहिष्णुतेला महत्त्वाचे स्थान आहे. रॉल्सने आपल्या विचारात कायमच उपेक्षित स्तरावरील लोकांच्या विकासाचा विचार केला आहे. रॉल्स म्हणतो की, हे तत्त्व जगातील सर्व लोकांना एकदम लागू करता यावयाचे नाही. परंतु प्रथम ते सुसंघटित समाजांना लागू केले पाहिजे. रॉल्सच्या तत्त्वज्ञानातील उणिवा मान्य करून त्यांचे राजकीय विचारांच्या क्षेत्रातील योगदान कोणीही अमान्य करणार नाही. त्यांनी मांडलेले सामाजिक न्यायविषयक विचार राजकीय विचारांना चालना देणारे आहेत तसेच राज्यकर्त्यावर्गांना भावी काळात सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी कोणती पथ्ये पाळावी लागतील वा धोरणे आखावी लागतील, यासाठी निश्चितच दिशादर्शक आहेत.

### ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**सुव्यवस्थित समाज :**आपआपल्या हितरक्षणासाठी एकत्र येऊन सहकार्य भावनेने परस्परांशी सहकार्याने राहणे म्हणजे 'सुव्यवस्थित समाज' होय.

**नागरी आज्ञाभंग** : प्रचलित कायद्याचा हेतुपूर्वक भंग करणे, तो मोडणे होय.

**अज्ञानाचा बुरखा (Veil of Ignorance)**: व्यक्तीला आपले स्थान, आपला वर्ग, सामाजिक दर्जा, बौद्धिक क्षमता, आपले हित व मानसिक कल इत्यादींविषयी ज्ञान नसणे.

### ३.५ सरावासाठी स्वाध्याय

### अ.स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

१. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील एक अत्यंत महत्त्वाचा तत्त्वज्ञ म्हणून कोणाचे नाव पुढे येते?

२.जॉन रॉल्स यांनी सर्वप्रथम न्याय कल्पना कोणत्या निबंधाद्वारे मांडले?

३. जॉन रॉल्स यांनी सामाजिक न्याय संकल्पनेस मध्यवर्ती मानून कोणता ग्रंथ लिहिलेला आहे?

४. कोणत्या विचारवंतांनी समतेची संकल्पना न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्मितीतील एक पाऊल या अर्थाने मांडलेली आहे?

५. जॉन रॉल्स यांनी कोणत्या साली मध्ये सर्वप्रथम सामाजिक सद्गुणाच्या दृष्टीने न्याय संकल्पनेचे विवेचन केले?

**ब. स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१. जॉन बोर्डल रॉल्स

२. 'Justice as Fairness'

३. 'A Theory of Justices'

४. जॉन बोर्डल रॉल्स

५. १९५८

**क.टीपा लिहा**

१. जॉन रॉल्स यांचे न्यायविषयक विचार

२. जॉन रॉल्स यांचे नागरी आज्ञाभंग संकल्पना

३. जॉन रॉल्स यांचे सुव्यवस्थित समाजविषयक विचार

४. जॉन रॉल्सचे समताविषयक विचार

**ड. सरावासाठी स्वाध्याय**

१. जॉन बोर्डल रॉल्स यांचे न्यायविषयक विचार सविस्तर स्पष्ट करा.

२. जॉन बोर्डल रॉल्स यांचे स्वातंत्र्यविषयक विचारांवरती चर्चा करा.

३. जॉन बोर्डल रॉल्सचे नागरी आज्ञाभंगाबाबतचे विचार स्पष्ट करा.

४. जॉन बोर्डल रॉल्सच्या विचारांचे टीकात्मक मूल्यमापन करा.

**३.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

१.Rawls, John, (1973), 'Theory of Justice' Oxford University,

२.Upadhyaya, Ashok (1999) 'John Rowls ( Concept of Justice)' Rawat Publications Jaipur

३. Rawls, John, (2001) 'Justice as Fairness-A restatement', Universal Publications, Delhi.

४. रेगे, मे. पुं., २००६, 'स्वातंत्र्य, समता व न्याय', मौज, मुंबई, (पूर्वप्रसिद्धी नवभारत, ऑक्टोबर २०१०, (पृ. ३-८.)

५.चौसाळकर अशोक, २०१७, ‘आधुनिक राजकीय सिद्धांत’,युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.लि, पुणे.
६. देव विजय, गोसावी शरद, आपटे संज्योत, (२०१२), ‘पाश्यात्य राजकीय विचारवंत’ डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
७. कुंभार नागोराव संपादित विचारशलाका ऑक्टोबर २००७ जोडअंक ७८ व ७९ विसाव्या शतकातील पाश्चात्य राज्यशास्त्रज्ञ विशेषांक २००७